# वाघ संस्थेतर्फे ग्रामीण क्रीडा स्पर्धा

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक व स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स यांच्या संयुक्त विद्यमाने संस्था संलग्न महाविद्यालय, तंत्रनिकेतन व शाळा येथे पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक या नाशिक जिल्हा आणि निफाड, चांदवड, दिंडोरी, सिन्नर व येवला तालुका मर्यादित क्रीडा ग्रामीण स्पर्धांचे आयोजन दिनांक १६ ते दिनांक २८ डिसेंबर या दरम्यान करण्यात आले आहे.

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ स्मृती चषक स्पर्धांचे यंदा दहावे वर्ष होय. दिनांक १६ डिसेंबर ते दिनांक १८ डिसेंबर रोजी नाशिक जिमखाना येथे बॅडमिंटन (मुले व मुली) स्पर्धेने कार्यक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. दिनांक १७ डिसेंबर रोजी के. के. वाघ युनिव्हर्सल स्कूल डीजीपीनगर, नाशिक येथे मुला व मुलींसाठी जिल्हास्तरीय बुद्धिबळ तर के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक येथे



स्कॅश स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक २२ डिसेंबर रोजी के. के. वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर येथे स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्सचे सचिव अजिंक्य वाघ उपस्थितीत व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ पार पडेल. त्यानंतर रस्सीखेच (मुले व मुली) या स्पर्धा पार होतील. तसेच दिनांक २३ डिसेंबर ते दिनांक २७ डिसेंबर यादरम्यान क्रिकेट स्पर्धा होणार आहेत. दिनांक २३ डिसेंबर रोजी के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळस येथे जिल्हास्तरीय कुस्ती होईल. के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय, चांदोरी, के.के. वाघ औषधनिर्माणशास्त्र संस्था व युनिव्हर्सल स्कूल चांदोरी येथे दिनांक २४ डिसेंबर रोजी खो-खो (मुले व मुली) व दिनांक २५ डिसेंबर रोजी व्हॉलीबॉल (मुले व मुली) स्पर्धा होतील. दिनांक २५ डिसेंबर रोजी के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय, काकासाहेबनगर (रानवड) येथे मुले व मुलींसाठी कबड्डी तर स्पर्धेचे आयोजन केले आहे.

दिनांक २६ डिसेंबर ते दिनांक २८ डिसेंबर रोजी के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक येथे मुले व मुलींसाठी (नाशिक ग्रामीण) फुटबॉल स्पर्धा पार पडणार आहेत. दिनांक २६ डिसेंबर रोजी सरस्वतीनगर येथील के. के. वाघ एज्युकेशन कॅम्पस येथे मुले व मुलींसाठी जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धा पार पडेल. के. के. वाघ विद्याभवन, भाऊसाहेबनगर येथे समारोप समारंभ कार्यक्रमाने स्पर्धेची सांगता होणार आहे. नाशिक जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालये व विद्यार्थ्यांनी स्पर्धांत सहभागी व्हावे, असे आवाहन के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्स्चेंज (स्माईल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्सचे सचिव अजिंक्य वाघ यांनी केले आहे. स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी स्पर्धकांनी ज्या-त्या शाळा व महाविद्यालयांशी संपर्क साधावा तसेच स्पर्धेबाबत अधिक माहिती व प्रवेश नोंदणीसाठी सुनील निरगुडे (९३२६८९५५६५) व सारंग नाईक (९९२३३३२९५० ) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

Gavkari 09-12-2023

# वाघ शिक्षण संस्थेतर्फे गुरुवारी इंडस्ट्री समिट

**नाशिक : प्रतिनिधी**

के.के.वाघ शिक्षण संस्थेमध्ये इंडस्ट्री समिट गुरुवारी सायंकाळी ५.३० वाजता के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय कॅम्पस येथे आयोजित करण्यात आले आहे.

या चर्चासत्रामध्ये इंडस्ट्री आणि इन्स्टिटयूट यांच्यातील प्रमुख मुद्यांवर चर्चा आणि त्यातून इंडस्ट्रीला हवे असणारे कौशल्य विकसित करणे, बदलते तंत्रज्ञान व मार्केटची गरज ओळखून नवनवीन उद्योग आणि मुख्यतः उद्योजक बनविण्याचे ध्येय ठेवत आत्मनिर्भर भारत मोहिमेकडे सकारात्मक वाटचाल, भविष्यातील रोजगाराच्या संधी निर्माण करणे इत्यादी मुद्द्यांवर चर्चा करणे हा या चर्चात्राचा उद्देश आहे. के. के. वाघच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पांची उपस्थित मान्यवरांकडून चर्चा घडवून आणले जाणार आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# क. का. वाघ संस्थेत उद्योगावर चर्चासत्र

**नाशिक :** येथील क. का. शिक्षण संस्थेच्यावतीने गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजता उद्योग या विषयावर तज्ज्ञांच्या उपस्थितीत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात हा कार्यक्रम होईल. यावेळी उद्योग व शिक्षण संस्था यांच्याशी संबंधित मुद्यांवर उहापोह केला जाईल. उद्योगाला हवे असणारे कौशल्य विकसित करणे, बदलते तंत्रज्ञान व बाजाराची गरज ओळखून नवनवीन उद्योग आणि मुख्यतः उद्योजक बनविण्याचे ध्येय ठेवत आत्मनिर्भर भारत मोहिमेकडे सकारात्मक वाटचाल, भविष्यातील रोजगाराच्या संधी निर्मिती आदींवर चर्चा होणार आहे.

## स्मितल ढाकेंना 'यूके रेल अॅवॉर्ड'; पहिली भारतीय महिला

# नाशिकच्या कन्येचा इंग्लंडमध्ये गौरव

म. टा. प्रतिनिधी, जळगाव

सध्या ब्रिटनमधील डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत असणाऱ्या व मूळच्या नाशिककर स्मितल ढाके (वय २६) यांना प्रतिष्ठेच्या 'युके रेल अॅवॉर्ड'ने नुकतेच गौरविण्यात आले आहे. 'न्यू कमर ऑफ द इअर'ने त्यांना बर्मिंघम येथे झालेल्या शानदार सोहळ्यात गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळवणाऱ्या स्मितल पहिल्या भारतीय आहेत. त्यांच्या या सन्मानाच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्याचाच नव्हे, तर देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

स्मितल यांचे वडील चंद्रशेखर ढाके नाशिकमधील, तर आईचे माहेर जळगाव येथील आहे. ढाके कुटुंब लंडनमध्ये स्थायिक असून, स्मितलचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लंडनमध्येच झाले. अभियांत्रिकीचे शिक्षण नाशिक येथील के. के. वाघ महाविद्यालयातून घेतले. त्यानंतर लंडनमधील किंग्ज कॉलेजमधून त्यांनी पुढील शिक्षण घेतले. त्या इंग्लंड आणि आयर्लंडमधील प्रसिद्ध कंपनी अलस्टॉम येथे डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत आहेत. यात स्मितल या पहिल्या आणि एकमेव डेटा सायंटिस्ट आहेत.

बर्मिंघम येथे नुकत्याच झालेल्या शानदार कार्यक्रमात स्मितल ढाके यांना 'न्यू कमर ऑफ द इअर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



> “ या पुरस्काराने आपल्याला आणखी चांगल्या प्रकारे काम करण्याची प्रेरणा मिळेल. आजवरच्या वाटचालीत अनेकांनी सहकार्य केले असून, या सर्वांचे मी आभार मानते.
>
> – स्मितल ढाके

स्मितल ढाकेंना 'यूके रेल ॲवॉर्ड'; पहिली भारतीय महिला

# नाशिकच्या कन्येचा इंग्लंडमध्ये गौरव

म. टा. प्रतिनिधी, जळगाव

सध्या ब्रिटनमधील डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत असणाऱ्या व मूळच्या नाशिककर स्मितल ढाके (वय २६) यांना प्रतिष्ठेच्या 'युके रेल ॲवॉर्ड'ने नुकतेच गौरविण्यात आले आहे. 'न्यू कमर ऑफ द इअर'ने त्यांना बर्मिंघम येथे झालेल्या शानदार सोहळ्यात गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळवणाऱ्या स्मितल पहिल्या भारतीय आहेत. त्यांच्या या सन्मानाच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्याचाच नव्हे, तर देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

स्मितल यांचे वडील चंद्रशेखर ढाके नाशिकमधील, तर आईचे माहेर जळगाव येथील आहे. ढाके कुटुंब लंडनमध्ये स्थायिक असून, स्मितलचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण लंडनमध्येच झाले. अभियांत्रिकीचे शिक्षण नाशिक येथील के. के. वाघ महाविद्यालयातून घेतले. त्यानंतर लंडनमधील किंग्ज कॉलेजमधून त्यांनी पुढील शिक्षण घेतले. त्या इंग्लंड आणि आयर्लंडमधील प्रसिद्ध कंपनी अलस्टॉम येथे डेटा सायंटिस्ट म्हणून कार्यरत आहेत. यात स्मितल या पहिल्या आणि एकमेव डेटा सायंटिस्ट आहेत.

बर्मिंघम येथे नुकत्याच झालेल्या शानदार कार्यक्रमात स्मितल ढाके यांना 'न्यू कमर ऑफ द इअर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



" या पुरस्काराने आपल्याला आणखी चांगल्या प्रकारे काम करण्याची प्रेरणा मिळेल. आजवरच्या वाटचालीत अनेकांनी सहकार्य केले असून, या सर्वांचे मी आभार मानते.

– स्मितल ढाके

LOKMAT TIMES • Anchor

# 'Industry Leaders Summit 3.0' charts city's future

OKMAT NEWS NETWORK
NASHIK, DEC 15

The 'Industry Leaders Summit 3.0' seminar, organised by the KK Wagh Education Society, took place recently at the KK Wagh College of Engineering Campus.

Key figures such as Sameer Wagh, Chairman of KK Wagh Education Society; Goraksh Garje, Director of Technical Education; Sudhir Mutalik, Former Chairman of CII; Ganesh Kothavade, CEO of ABB; Saket Chaturvedi, CEO of HAL and Ravi Damodaran of Ekagra Solutions were present on the dais. More than 150 entrepreneurs participated in this seminar. Dr KN Nandurkar, the Principal of the Engineering College, started the programme with an introduction.




Dr PK Shahabadkar, the Training Placement Officer, shared his thoughts on 'Industry Leaders Summit 3.0'. The dignitaries also paid tributes to Late Balasaheb Wagh, the founder president of the organisation.

The seminar mainly focused on important topics, including discussions on major issues between industries and institutions, the development of skills required by the industry, adapting to changing technology and market needs, and taking positive steps toward the Atmanirbhar Bharat campaign, emphasising the creation of new industries and entrepreneurs, and generating future employment opportunities.

The focal points of the seminar were digital transformation and industry, research and technology, industrial development and promotion, challenges of sustainable development, economic policies, and the future of industry and intellectual development.

An exhibition was also organised in this summit where various projects prepared by students from KK Wagh Colleges were presented.

Prof Snehal Chaudhary and Prof Ruchita Gaidhani anchored the programme, while Principal PT Kadve proposed the vote of thanks.

लोकमत

# इंडिजिनायजेशनच्या युगात विद्यार्थ्यांना संधी

## चतुर्वेदी : के. के. वाघच्या इंडस्ट्री समिटला उद्योजकांचा प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**पंचवटी :** इंडिजिनायजेशनच्या युगात नव उद्योजकांना स्टार्टअपची तर विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात नोकरीची संधी आहे. त्यासाठी के. के. वाघ शिक्षण संस्थेने इंडस्ट्री समिटच्या माध्यमातून सर्व उद्योजकांना एकत्र आणणे महत्त्वाचे आहे. यातून महाविद्यालय व इंडस्ट्री यांच्यात सलोख्याचे संबंध निर्माण होतात. त्यासाठी वाघ शिक्षण संस्था प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन एचएलचे सीईओ साकेत चतुर्वेदी यांनी केले.

के.के. वाघ शिक्षण संस्थेमध्ये इंडस्ट्री समिट ३.० अर्थात चर्चासत्रात ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, तंत्रशिक्षण संचालक गोरक्ष गर्जे, सी.आय.आय.चे माजी चेअरमन सुधीर मुतालिक, एबीबी कंपनीचे सीईओ गणेश कोठावदे, एकाग्रा सोल्यूशनचे रवी दामोदरन उपस्थित होते. १५० हून अधिक उद्योजकांनी चर्चासत्रात सहभाग नोंदवला. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी प्रास्ताविक केले.



के. के. वाघ महाविद्यालयात आयोजित चर्चासत्रात मार्गदर्शन करताना साकेत चतुर्वेदी. समवेत मान्यवर.

त्यानंतर ट्रेनिंग प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रामुख्याने डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि उद्योग जगत, संशोधन आणि तंत्रज्ञान, उद्योजकता विकास व उद्योगाला चालना, शाश्वत विकासाची आव्हाने, आर्थिक धोरणे आणि उद्योगाचे भवितव्य तसेच बुद्धिमत्ता विकास या विषयावर सखोल चर्चा झाली. तसेच के. के. वाघ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रकल्पांचे प्रदर्शन आयोजित केले होते. प्राचार्य पी. टी. कडवे यांनी आभार प्रदर्शन केले. प्रा. स्नेहल चौधरी व प्रा. रुचिता गायधनी यांनी सूत्रसंचालन केले.

Nashik Main
Page No. 10 Dec 16, 2023
Powered by: erelego.com



# K. K. WAGH EDUCATION SOCIETY



Central Office : Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, Nashik-03
Ph. No. : (0253) 2221109, 2221111, 2221120
Email ID : disp-co@kkwagh.edu.in Website : www.kkwagh.edu.in

## वैशिष्ट्ये :

- गेली ५२ वर्षे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रदान करणारी संस्था. के.जी. पासून पीएच.डी. पर्यंत विविध शाखांमध्ये शिक्षणाची सोय उपलब्ध.
- अभियांत्रिकी महाविद्यालयातील सात (७) शाखांना व तंत्रनिकेतनच्या चार (४) शाखांना NBA, New Delhi कडून मानांकन प्राप्त.
- अभियांत्रिकी महाविद्यालय व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयास NAAC द्वारा 'अ' श्रेणी प्राप्त.
- सन २०२२–२३ पासून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) नवी दिल्लीकडून अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा (Autonomous Status) मिळाले असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या शिफारशींनुसार अभ्यासक्रमाची रचना.
- रोजगार व उच्च शिक्षणाच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- शिक्षण संस्थेचा औद्योगिक आस्थापनांशी असलेल्या सामंजस्यावर आधारित राष्ट्रीय स्तरावरील AICTE - CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास ४ वेळा 'Platinum Category' (सर्वोत्कृष्ट दर्जा) प्राप्त.
- सहा विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था.
- अभिजात भारतीय कला जोपासणारी – 'ललितकला व प्रयोगजिवी कला शिक्षण' महाविद्यालये.
- विद्यार्थी विकास केंद्रित शिक्षणावर भर देणारी शिक्षण संस्था.
- AICTE - Idea Lab साठी अनुदान मिळवणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय.



## Following new programmms have started recently :

- Artificial Intelligence & Data Science (Under Engineering)
- Robotics & Automation (Under Engineering)
- Computer Science & Design (Under Engineering)
- Artificial & Intelligence Machine Learning in Polytechnic
- Diploma in Pharmacy in Degree Pharmacy Institute
- BVA (Painting & Sculpture) in Fine Arts College

दैनिक **पुढारी** वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

**श्री. समीर बी. वाघ, अध्यक्ष**

के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक.

विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक,
शिक्षकेतर कर्मचारीवृंद व आजी–माजी विद्यार्थी

## Constituents of K. K. Wagh Education Society

Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools